# व्रत-साधना



IRBK-0104053

मं. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. ना.
क्र. ४०५३

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

# व्रत-साधना

ठा० क्र- ४०५३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

— मुद्रक व प्रकाशक —

दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए. ( टिळक ),

चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें २.

प्रथमावृत्ति : एप्रिल १९५२

१ प्रथमावृत्तीखेरीज इतर सर्व अधिकार सौ० नीरा गोपाल दाण्डेकर यांचे स्वाधीन आहेत.

२ प्रयोग करण्यापूर्वी लेखन -पारिश्रमिकादाखल दहा रुपये लेखकाकडे पाठवून त्याची अनुज्ञा घेणें आवश्यक आहे.

माझे धाकटे भाऊ

योगीनाथ नवणी

आणि

राजा केणेकर

या दोघांस—

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

# नांदी

मी नाट्यप्रासादांत असा ढकलला गेलों—

माझे सुहृद् श्री. भ. त्र्यं. पंडित यांच्या घरीं सहज एक चक्कर मारावी अशा हेतूनें गेलों असतां त्यांनीं सर्वप्रथम प्रश्न विचारला, तो हा; "नाटक कुठं आहे?"

मला कांहीं कळेचना. शेवटीं भगवानरावांनींच मला त्या संदेह-सागरांतून बाहेर काढलें. 'महाराष्ट्रीय कलोपासक' या पुण्याच्या नाट्यप्रेमी संस्थेनें एक नाट्यलेखनस्पर्धा जाहीर केली. त्या स्पर्धेचें परिपत्रक त्यांनीं मजकडेहि धाडलें. पण पाठीमागें कामांची बहुत (!) गर्दी असल्यामुळें मीं तिकडे अजिबात दुर्लक्ष केलें, एवढेंच नव्हे, तर ती घटना मी विसरूनहि गेलों.

भगवानराव मात्र मला विसरले नव्हते. त्यांनीं हुकूम फर्मावला, "नाटकें आम्हांकडे पाठवायचा दिनांक ४ दिवसांवर आला आहे. काय वाटेल तें करा! नाटक हवें आहे!"

नाइलाजच होता. शेवटीं पुणें—मुंबईची सफर करण्याच्या घाईंत अर्धा भाग लिहिला, अर्धा एका सुप्रभातीं लिहून काढला.

भगवानराव एकदां मला चेष्टेनें असें म्हणाले, "तुम्ही संस्कृतिवादी मंडळी संस्कृतीसंबंधीं नेहमीं मोघम बोलतां! म्हणे आमची संस्कृति अशी होती अन् तशी होती! कशी होती तें नेमकं बोट ठेवून दाखवा कीं!"

त्यांनीं केलेला हा परिहास माझ्या जिव्हारीं लागला. अनायासें त्यांनींच प्रसंग उपस्थित केला. तेव्हां आमच्या संस्कृतीचा एक पैलू ज्यांत किंचित्सा उपलवून दाखविला गेला आहे, असें हें "व्रतसाधना" लिहून भगवानरावांच्या पुढें हें असें झोंकून दिलें!

एकलव्य हा एक आदर्श विद्यार्थी आहे. तो बुद्धिमान् आहे, साक्षेपी आहे, कष्टांची तमा न बाळगणारा आहे. आज एकीकडे विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनांत अधिकाधिक विद्योपार्जनसाधनें उपलब्ध होत असतां दुसरीकडे विद्यार्थ्यांचा साक्षेप कमी होत आहे, हें एक दुर्दैवी सत्य आहे.

या कोसळत्या आभाळास मीं माझ्या इटुकल्या प्रयत्नाचें हें ठिगळ लावलें आहे. नाटकाचें तंत्र मला फारसें माहीत नाहीं. पण मला ठाऊकी असलेल्या मंत्राचा प्रतिध्वनि यांत उमटला आहे. नाट्यलेखन-स्पर्धेंत या नाटकास मिळालेलें पारितोषक हें या गोष्टीचें गमक आहे.

हा मंत्र विद्यार्थ्यांच्या जीवनांत प्रविष्ट होऊन तीं जीवनें साक्षेपी होवोत.

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर
तळेगांव दाभाडे, जि. पुणें

या नाटकाचा प्रथम प्रयोग महाराष्ट्रीय कलोपासकांचे द्वारें होणाऱ्या सन १९५२ च्या एप्रिलमधील नाट्यस्पर्धेंत नू. म. वि. च्या विद्यार्थ्यांनीं पुणें येथें केला.

## पात्रें

१. एकलव्य
२. हिरण्यधनु
३. पिप्पल
४. ताल
५. तमाल
६. विराध
७. दीर्घयष्टि
८. द्रोण
९. दुर्योधन
१० दु:शासन
११. विकल्प
१२. भीम
१३. अर्जुन
१४. नकुल
१५. सहदेव

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

# सामुग्री

विटी; दांडू; धनुष्यें; बाण; हातीं धरायची काठी; मातीचा बसलेला मनुष्याकृति, बुजगावण्यासारखा पुतळा; कमंडलु; फुलें; खड्गें; गदा; त्रिशूल इत्यादि शस्त्रें.

# वेष

**पिप्पल**--डोईस एक चिंधी बांधलेली. नेसूचें अगदीं वर ओढून कसलेलें फाटकें धोतर. बाकी शरीर उघडें.

**विराध आदि भिल्लपुत्र**--केश विस्कटलेले, डोक्यांवर पिसें बांधलेलीं. अगदीं वर नेसलेलीं धोतरें. बाकी शरीरें उघडीं.

**एकलव्य**—डोक्यास मोरपीस. दंडांत बाहुबंधन. व्याघ्रचर्म नेसलेला. शरीर उघडें. गळ्यांत ताईत.

**हिरण्यधनु**—शिरावर चारसहा मोरपिसें. गळ्यांत ताईत. बाहु-बंधनें. व्याघ्रचर्म नेसलेला. शरीर उघडें. भव्य मिशा.

**द्रोण**—जटा, दाढी, मिशा. शरीर उघडें. भस्मचर्चा. दुटांगी धोतर.

**दुर्योधन आदि राजपुत्र**—डोईवर मोकळे विस्तीर्ण केस, रेशमी अगर जरीकांठी दुटांगी धोतरें नेसलेले. अंगांत मलमलीचे अंगरखे. कमरेस गुंडाळलेले शेले. कपाळीं गंधें.

# व्रत-साधना

## प्रथम अंक

[ अरण्यांतील भिल्लांची वसती, मोकळें पटांगण, एक झाड, त्याचा ओटा. दोन भिल्ल लाकडांच्या मोळ्या घेऊन एकीकडून दुसरीकडे निघून जातात. म्हातारा पिप्पल काठी टेकीत टेकीत येतो. त्याच्या मागोमाग " पिप्पलकाका ! ओ पिप्पलकाका ! " अशा हांका मारीत एकलव्य, विराध व दीर्घयष्टि अशीं तीन मुलें येतात. पिप्पल थांबतो. ]

**एकलव्य**:–पिप्पलकाका, आम्हीं तुम्हांला खूप शोधलं !

**पिप्पल**:–कशासाठीं रे ?

**विराध**:–त्या दिवशीं डुकराच्या शिकारीसाठीं गेलों होतों आपण. दुपारीं जेवायला बसलों. तेव्हां तुम्हीं आपल्या या विंध्य पर्वताची गोष्ट सुरूं केली. तेवढ्यांत डुक्कर उठला, अन् आम्हीं सगळे त्याच्यामागें धांवलों. अपुरी राहिली गोष्ट. आज हा एकलव्य म्हणाला, कीं तुम्हांला शोधून काढून तेवढी गोष्ट ऐकायची तुमच्याकडून.

**पिप्पल:**—पुढं ? पुढचा इतिहास अगदीं थोडा आहे वनराजांनो! या पृथ्वीमातेच्या अंगाखांद्यांवर खेळून तिची फारशी चिंता न करतां जे आकाशांतल्या चंद्रसूर्यांची पूजा करण्यांत भूषण मानतात, त्यांच्यापैकीं एक अगस्ति नांवाचा म्हातारा ब्राह्मण विंध्याजवळ आला !

**दीर्घयष्टि:**—विंध्याचं त्याच्याकडे लक्ष गेलं का ?

**पिप्पल:**—दारीं आलेल्या वृद्ध अतिथीकडं लक्ष न जाण्याइतका विंध्य उद्दाम झाला नव्हता. त्यानं त्या वृद्धाचं स्वागत केलं. अगस्तीनं त्याच्याजवळ दक्षिणसागराची यात्रा करण्यासाठीं वाट मागितली. विंध्यानं आपलं उंच वाढलेलं शिर नमवून अगस्तीला वाट दिली.

**एकलव्य:**—अन् मग तो पुन: कां उभा राहिला नाहीं ?

**पिप्पल:**—हातीं आलेलं सावज मोकळं सोडावं, हा भोळा भाव माणसाच्या अंगीं कुठून उपजायला ? अगस्तीनं एकदां भूमीवर मस्तक टेकलेल्या विंध्याला सांगितलं कीं मी सागराची वाळू गंगेंत टाकण्यासाठीं आणीस्तोंवर तूं असाच रहा.

**विराध:**—आणि मग अगस्ति काय दुसरीकडून—?

**पिप्पल:**—नाहीं. अगस्ति परतलाच नाहीं ! त्यानं घातलेली आण पुरी करण्यासाठीं विंध्य अजून तसाच मस्तक नम्र करून त्याची वाट पहात आहे. आणि त्या विंध्याच्या कुशींत वागडणारीं आम्हीं त्याचीं पोरं—जाऊं द्या पोरांनो ! सांगवत नाहीं आतां !

**एकलव्य:**—सांगा ना काका ! आम्हांला असं अर्ध्या ताटावरून उठवूं नका.

**पिप्पल:**—काय सांगूं ? विंध्य वाढूं लागला, सूर्याची उष्णता अधिक जाणवूं लागली. विंध्यावर राहणाऱ्या आमच्या पूर्वजांचीं शरीरं काळींठिक्कर पडलीं. तरी पण ते तसाच नेट धरून सूर्याला शिक्षा लावण्याच्या ईर्षेनं आपल्या ठिकाणीं ठाण मांडून उभे राहिले.

ग्रंथालय ... नों. दि. 39

धनुष्याच्या प्रत्यंचांचे टणत्कार घुमूं लागले. बाणांचीं तेजस्वी पातीं जळत्या सूर्यप्रकाशांत डोलानं लखलखूं लागलीं. सूर्यमंडल जवळ दिसूं लागलं. सगळं जग कौतुकानं या विंध्यपुत्रांच्या पराक्रमाकडं बघूं लागलं. पण — ! [ क्षणभर थांबतो. ]

**एकलव्यः**—काका, कां थांबलांत ?

**पिप्पलः**—थांबलों पुढें घडलेल्या प्रसंगाच्या हृदय फाडून टाकणाऱ्या आठवणीनं. पण अगस्तीला नमस्कार करण्यासाठीं विंध्य खालीं नमला, आणि सूर्यमंडळास शिक्षा करण्याचे त्यांचे मनोरथ ठाईंच्या ठाईंच थिजले. राहिला तो केवळ शरिराचा काळा रंग. सगळं जग उपहासानं हंसूं लागलं. तो अपमान सहन होईना, म्हणून आमच्या पूर्वजांनीं नियम केला, कीं आतां इथून पुढं वन सोडून कुणींहि भिल्लानं नगरांत जाऊं नये. इथं जी काय शिकार मिळेल, तेवढ्यावरच आपला चरितार्थ चालवावा. तेंव्हांपासून हें असं रानांतलं जिणं जगतों आहोंत आम्ही. झापांच्या झोंपड्या, हे आमचे महाल ! डुकराचं मांस, हें आमचं पक्वान्न ! अडाणी, उघडींनागडीं पोरं, ही आमची भावी संपत्ति ! त्यांना धड अस्त्रविद्याहि शिकवायचं सामर्थ्य नाहीं आमच्यांत—

[ आंतून तमाल ओरडतो, " ए विराधा ! विटी झेल रे एवढी ! हा झालाच बाद ताल ! " विटी येते. विराध झेलायची धडपड करतो. पण ती खालीं पडते. धांवत तमाल व मागोमाग हातीं दांडू घेतलेला ताल असे प्रवेश करतात. ]

**तमालः**—साधी विटी झेलतां येईना तुला विराधा ! कशाला भिल्लांच्या वंशांत जन्म घेतलास ?

**तालः**—अरे तमाला ! कसला भिल्ल हा ? एक गुपित सांगतों तुला. याच्या आईनं नाचणीचा कोंडा देऊन विकत घेतला होता याला !

**विराधः**—बरं बरं ! अहो तालमहाराज, पुरे करा कीं आतां ! आपण मोठी घारच मारली आहे कीं नाहीं ! आईबापांनीं मोठ्या कौतुकानं याचं नांव ताल ठेवलं. त्यांना वाटलं, हा भिल्लांच्या वंशांत शोभण्याजोगा तालाच्या झाडासारखा उंचापुरा होईल ! पण हे राजेश्री कसले ? कासवाच्या पाठीवर चढण्यासाठीं याला शिडी लावावी लागते !

**पिप्पलः**—विराधा, एखाद्या ऋषिपुत्रासारख्या उपमा देऊन वाद घातलास, तरी तुला विटी झेलतां आली नाहीं, हें कांहीं खोटं नव्हे. अरे, धनुष्यबाणाच्या शिकारीवरच ज्यांची चूल चालते, त्या आम्हां भिल्लांना हें कांहीं मोठं शोभण्यासारखं नाहीं.

**विराधः**—काका, माझं एक असूं द्या हो ! सगळेच मला नांवं ठेवताहेत. पण त्या दिवशीं या दीर्घयष्टीनं अगदीं डोळांदेखतां ससा हातून सोडून दिला !

**दीर्घयष्टिः**-ससा कीं मासा ?

**विराधः**—आतां करा टाळाटाळी. अरे, गेल्या अमावास्येला आम्ही पोरंपोरं निघालों शिकारीला. पलीकडल्या खांदकड्याच्या पोटाशीं वागुर लावली, तिथं केला या दीर्घयष्टीला उभा. म्हटलं चांगला लांबलचक आहे, मेजकी शिकार धरील. आम्ही सगळेजण भोंवतालच्या जाळ्यांतून हुसकाहुसकी करीत वागुरीकडं निघालों. एक पांढराफेक ससा नुसत्या भिंगरीसारख्या उड्या घालीत भेदरल्या डोळ्यांनीं इकडे तिकडे पहात वागुरीकडं निघाला.

**एकलव्यः**—अन् मग हा काय झोंपा घेत होता कीं काय ?

**विराधः**—झोंप घेत नव्हता, तिची तयारी करीत होता. आम्ही म्हणालों कीं नेमका ससा वागुरींत सांपडणार. मोठ्या आशेनं आम्ही वागुरीजवळ गेलों, तर टरटरा पाठ खाजवींत अन् जांभया देत हा आपला उभाच ! ससा पळाला पायांनीं माती उडवीत ! [ मुलें हंसतात. ]

**दीर्घयष्टि**:—मीं कां सशाला सोडून दिलं, हें तुम्हांला कुठं माहीत आहे? तुम्ही नुसती निंदाच करीत बसा!

**विराध**:—कां हो सोडून दिलंत? एकदां कळूं द्या तरी!

**दीर्घयष्टि**:—मला नेमकी त्या वेळीं आठवण झाली, कीं अहिंसा हा परम धर्म का काय म्हणतात तो आहे. आपल्या गौतमी नदीच्या कांठीं रहात असलेला तो म्हातारा दाढीवाला ऋषि असंच कांहींसं सांगतो ना?

**विराध**:—अहो बकध्यानी ऋषिवर्य! मग रात्रीं आईनं शिजविलेला कवडा कांहो मुरके मारून ओरपीत होतांत? तें कांहीं नाहीं. तत्त्वज्ञान, ही दुर्बळपणा झांकण्याची ढाल आहे, असं परवांच आपल्या महाराज हिरण्यधनूंच्या घरीं आलेला एक ऋषि म्हणत होता.

**दीर्घयष्टि**:—अरे आमचंच काय कौतुक सांगतां? आमचा हा राजपुत्र एकलव्य सुद्धां—[ हंसतो. ]

**विराध**:—काय झालं?

**दीर्घयष्टि** कांहीं विचारूं नका! [ पुनः खिदळतो. ]

**एकलव्य**:—अरे सांग कीं!

**दीर्घयष्टि**:—ऊं हूं! [ पुनः हंसतो. ]

**तमाल**:—आतां सांगतोस, कीं सगळे मिळून करूं टांगाटोळी?

**दीर्घयष्टि**:—अरे, काय म्हणून काय विचारतां? परवां हा अन् मी दोघे बसलों नदींत गळ टाकून. तर याच्या गळाला लागलेला मासासुद्धां याला नीट टोपलींत टाकतां आला नाहीं. सुळकन् त्यानं नदींत उडी मारली! [ एकलव्य रागावून ओट्याजवळ जाऊन उभा राहतो. ]

**पिप्पल**:—[ जाग्यावरून उठत ] सगळेच सारखे! कुणाला निंदायला नको, आणि कुणाला वंदायला नको. आम्हां भिल्लांचा जन्म असाच जायचा! शिकारीवर दहा दगड मारावे, तेव्हां

एखादा लागायचा. शूर, साहसी, काटक, असा हा भिल्लांचा वंश केवळ कोणी शिकवायला नाहीं, म्हणून अशाच रानवटासारख्या शिकारी करीत रहायचा. भ्यायचे नाहींत वाघाला सुद्धां ! पण नागरी माणूस एका बाणांत त्याचा प्राण घेईल, तर हा सगळा गांवच्या गांव त्याच्यामागं लागेल. दोन चार पडतील; उलथतील; आणि सकाळपासून त्याच्याशीं झुंजतील, तेव्हां कुठं संध्याकाळीं काठ्यांचे हजार घाव घालून त्याचा प्राण घेतील.

**एकलव्यः**–काका, आम्ही सुद्धां मनांत आणलं तर नागरी माणसांवर ताण करून दाखवूं. त्यांची कांहीं एवढी ऐटी नको.

**पिप्पलः**–राजपुत्रा, माणसाचं उचित मूल्य त्याला द्यायला हवं. खरोखरीच नागरी माणसांची बरोबरी तुमच्याच्यानं एवढ्या बाबतींत तरी नाहीं करवायची.

**एकलव्यः**–आम्ही काय माणसं नाहीं ? अभ्यास केला, तर वाघसिंहांना कुत्र्यासारखं मागं हिंडवतां येतं. मग अस्त्रविद्येची काय कथा !

**पिप्पलः**–चुकीची समजूत आहे तुझी एकलव्या. धनुर्विद्या शिकायला तुमच्याजवळ साधनं नाहींत, मत्स्ययंत्रं नाहींत, दारूयंत्रं नाहींत, आकाशचक्रं नाहींत, कुणी शिकविणारा नाहीं—

**एकलव्यः**–नसेना का ! तरी आम्हीं लक्षपूर्वक मारलेला बाण बरोब्बर आपलं लक्ष्य भेदून जातो—

**पिप्पलः**–जात नाहीं. दाखवतोस बाण मारून ? तें बघ, [ नेपथ्यांत दाखवितो ] तें चाफ्याचं झाड, त्यावर तीं दोन फुलं. वाऱ्यानं ती दोन्हीं आडवींतिडवीं हलताहेत. यांतलं अलीकडचं फूल तुटूं न देतां पलीकडील तोडशील ?

**एकलव्यः**–त्यांत काय अवघड आहे काका ? तो तर माझ्या हातचा मळ आहे.

**पिप्पल**:–बडबडूं नये, करून दाखवावं.

**एकलव्य**:--पहा तर आतां महाराज हिरण्यधनूंच्या पुत्राचा, एकलव्याचा प्रताप !

[ भात्यांतून बाण काढून धनुष्यावर चढवितो, तों हिरण्यधनु हळूंहळूं मागें येऊन उभा राहतो. एकलव्य नेम धरून बाण सोडतो. तो चुकतो. ]

**हिरण्यधनु**:–गर्वाचं घर नेहमीं खालीं असतं एकलव्या !

**एकलव्य**:–बाबा !

**हिरण्यधनु**:–होय मुला ! पिप्पलकाकांशीं तुमचं जें काय बोलणं चाललं होतं, तें आम्ही लांबून ऐकत होतों. पिप्पलकाका अगदीं बरोबर सांगत होते. शिकायचीं साधनं आणि शिकविणारा कुणी नसल्यानं या देशांतल्या अनेक मुलांचं जीवन मातीमोल होतंय् .

**एकलव्य**:-बाबा ! तुम्ही कां नाहीं आणीत तीं मत्स्ययंत्रं ? तुम्ही कां नाहीं आणीत कोणी शिकविणारा ?

**हिरण्यधनु**:–बाळ, आम्ही दरिद्री आहोंत रे ! आम्ही राजे असलों तरी भिल्लांचे. झाडाखालीं कंबळांच्या खोपटांत मांडलेली तीन दगडांची चूल आणि हरणाचं मांस शिजविण्यासाठीं असलेलं काळं खापरी मडकं, ही ज्यांची संपत्ति, पोर जन्मल्याबरोबर दुसरे दिवशीं त्याला उराशीं बांधून ज्यांना नवऱ्यामागं हरणांची पारध करीत धांवावं लागतं, अशा स्त्रिया आणि त्यांचीं उघडीनागडीं मुलं, हें ज्यांचं कुटुंब, अशा भिल्लांचे आम्हीं राजे आहोंत ! उडदांतले काळेगोरे निवडण्यासारखंच आहे तें !

**एकलव्य**--बाबा, मग नागरी माणसं शिक्षणाची व्यवस्था काय करतात ?

**हिरण्यधनु**:–नागरी माणसं ? त्यांचीं मोठमोठीं विद्यालयं असतात.

त्यांत मोठमोठ्या विद्वान् अध्यापकांची योजना केलेली असते. त्यांच्या मोठमोठ्या प्रयोगशाला, वेधशाला असतात. त्यांत त्यांचीं मुलं अध्ययन करतात.

**एकलव्य**:—हस्तिनापुरासहि असलं विद्यालय आहे ?

**हिरण्यधनु**:—होय बाळ. तिथं द्रोणाचार्य या नांवाचे एक मोठे विद्वान् आचार्य त्या विद्यालयाचे कुलगुरु आहेत. शस्त्रास्त्रविद्येंत त्यांचा हात धरणारा या भरतखंडांत कुणीहि नाहीं. त्यांच्याजवळ सम्राट् धृतराष्ट्रांनीं आपलीं शंभर आणि पंडूचीं पांच अशीं एकशेंपांच मुलं शिकण्यासाठीं ठेवलीं आहेत.

**एकलव्य**:—बाबा, ते मला नाहीं शिकवणार ? [ हिरण्यधनु स्वस्थ उभा राहतो. ] सांगा ना बाबा !

**पिप्पल**:—बाळ, द्रोणाचार्य स्वभावानं फार चांगले आहेत. पण—

**एकलव्य**:—पण काय ?

**हिरण्यधनु**:—मनुष्य द्रव्याच्या बळावर विकत घेतला जातो एकलव्या ! द्रोणाचार्यांना सम्राटांकडून द्रव्य दिलं जातं. कदाचित् ते तुला शिकविणार नाहींत.

**एकलव्य**:—कां शिकविणार नाहींत ? धृतराष्ट्रांचीं मुलं राजपुत्र असतील, मीहि राजपुत्र आहें. त्यांच्याकडून आचार्य द्रोणांना द्रव्य मिळतं, तर मीहि त्यांच्यासाठीं वाघाचीं कातडीं, हस्तिदंत, मधाचे कलश, असं घेऊन जाईन. बाबा, जाऊं का मी ? सांगा ना बाबा ? [ हिरण्यधनु बोलत नाहीं. ] बाबा, बोला ना ? तुमच्या मुलानं आपल्या पूर्वजांसारखं त्या राजपुत्राच्या तोडीचं, शस्त्रास्त्रविद्येंत प्रवीण व्हावं, असं नाहीं का तुम्हांला वाटत ? मी असाच ठोंब्या राहूं का ? केवळ दगडाधोंड्यांनीं हरणांची आणि सशांची शिकार करीतच मी जगूं का ? बोला ना बाबा !

**हिरण्यधनु**:—बाळ, आपल्या मुलानं असंच रानटी जिणं जगावं,

असं कोणत्या बापाला वाटेल? पण मन साशंक होतंय्, तें यशाच्या अनिश्चिततेची चाहूल लागून.

**एकलव्यः**—बाबा, तुम्ही मुळींच चिंता करूं नका. मी द्रोणाचार्यांकडून विद्या शिकूनच परत येईन! एरव्हीं तुम्हांला तोंड दाखविणार नाहीं. केवळ तुमचा आशीर्वादच पाठीशीं असूं दे.

**हिरण्यधनुः**—ठीक आहे एकलव्या! माझा तुला आशीर्वाद आहे. तूं परत येईपर्यंत आम्ही तुझी वाट पहात असूं.

**विराधः**—महाराज, आम्ही जाऊं का एकलव्याबरोबर? म्हणजे अध्ययन करतांना तेवढीच त्याची करमणूक होईल!

**हिरण्यधनुः**—नको! तो ज्ञानप्राप्तीसाठीं निघाला आहे. ज्ञान मिळविण्यासाठीं काय कष्ट करावे लागतात, याचा त्याला अनुभव येऊं दे. तो विद्यार्थी आहे, सुखार्थी नाहीं! विद्यार्थ्याला सुख नाहीं, सुखार्थ्याशीं विद्येची कधीं गांठ पडायची नाहीं. हस्तिनापुरांत जाऊन तिथं आचार्यांच्या सगळ्या कसोट्यांतून पार पडून एकलव्य जेव्हां परत येईल, तेव्हां मग तुम्ही त्याची काय करमणूक करायची ती करा.

**एकलव्यः**—येतों बाबा! [ हिरण्यधनु आणि पिप्पल यांना नमस्कार करतो.]

**हिरण्यधनुः**—ये बाळ!

[ एकलव्य जातो. यवनिका पतन. ]

# द्वितीय अंक

[ हस्तिनापुरांतील द्रोणाचार्यांची पाठशाळा. द्रोणाचार्यांच आसन. त्याच्या दुतर्फा राजपुत्रांना बसण्यासाठीं टाकलेलीं आसनें. निरनिराळ्या ठिकाणीं गदा, तरवारी, धनुष्यें, भाले, शूल, तोमर इत्यादि शस्त्रें ठेवलीं आहेत. एका कोपऱ्यांत टांगलेली घंटा.

एक विद्यार्थी येऊन घंटा वाजवितो. दुर्योधन, दुःशासन, त्यांचा मित्र विकल्प, आणि दुसरे दोन धृतराष्ट्रपुत्र येतात. दुर्योधन आल्याबरोबर गदेकडे जातो, ती उचलून पाहतो. ]

**दुःशासनः**– [ आळस देत ] दादा, असा आळस आलाय् हें युद्धाचं शास्त्र शिकायचा ! वाटतं कीं—

**दुर्योधनः**–[ गदा उचलून खांद्यावर टाकीत, त्याच्याकडे वळून ] क्षत्रियांनीं नेहमीं उद्योगी असायला हवं दुःशासना ! आळस हा क्षत्रियांचा शत्रु आहे !

**विकल्पः**–पण इथं मांडा ठोकून बसल्या बसल्या आळसाशीं लढणं कसं काय जमायचं युवराज ? अहो, आळस असो, कीं महाआळस असो. त्याला म्हणावं, लेका असा इथं पाठशाळेंत काय येतोस उंडारल्या उंदरासारखा ! बाहेर ये ! मैदानांत ये ! तुझे कोण इष्टमित्र असतील त्यांना घेऊन ये. शस्त्रं घेऊन ये. अस्त्रं घेऊन ये. केस पिंजारीत ये. दाढी गोंजारीत ये. तिथं युद्धाकारितां सिद्ध होऊन वाट पहा. आणि मग—आणि मग आमचे राजपुत्र दुःशासन आणि युवराज दुर्योधन तुझी कशी फटफजिती उडवतात, तें पहाण्यासाठीं डोळे उघडे असूं दे म्हणजे झालं !

**दुर्योधनः**–हें झालं आम्हां दोघांविषयीं. विकल्पा, तुझं काय ?

**विकल्पः**–माझं ? हो. माझं काय ?? नाहीं ! माझं असं

आहे युवराज, नम्रता हा शूरांना आणि विद्वानांना शोभणारा सद्‌गुण मीं अगोदरच उचलून कनवटीला लावून ठेवला आहे. त्यामुळं शत्रूशीं युद्ध करायचा कधीं प्रसंगच येत नाहीं माझ्या-वर! आतां हेंच पहा ना, मी चालत असतां जर आळस माझ्याकडे नाक फेंदारून गुरकावत आला, तर मी नम्रपणें माघार घेऊन एखाद्या छानदार झाडाखालीं बसतों. तरीहि त्यानं न ऐकलं, तर मी आणखी नम्र होऊन डोळे मिटून आडवा होतों, आणि मग काय होतं तें कोण जाणे! लोक मला आळशी म्हणतात. पण त्यांना आमची ही युक्ति काय माहीत?

**दुर्योधनः**--विकल्पा, तूं आहेस खरा मोठा युक्तिवान्! मग काय रे? या भीमाची चांगली जिरवायची एखादी युक्ति सांग कीं!

**विकल्पः**—त्या हाडकुळ्या भीमाची ना? [ भीम प्रवेश करतो, थबकतो. ] त्या मरतुकड्या भीमाची जिरवायची, हें काम. अगदीं सोपं आहे!

[ भीम पुढें येतो, विकल्पाची गचांडी धरून त्याला विचारतो ]

**भीमः**--हं सांग विकल्पा, मरतुकडया, हाडकुळ्या भीमाची कशी जिरवायची ती?

**विकल्पः**—नाहीं नाहीं! अयोयोयोयो! अरे मेलों! अगदीं पार मेलों! मेल्यावर मग मी कसा सांगूं शकेन भीमा?

**भीमः**--शंख करूं नकोस! आरडाओरडा करून सगळा गांव गोळा करण्यासारखा ठणठणीत आहेस तूं अजून. सांग!

**विकल्पः**—भीमा, तुला धर्मयुद्धाचे नियम अगदींच माहीत नाहींत कीं रे!

**भीमः**—[ त्याला सोडीत ] माहीत नाहींत?

**विकल्पः**—ऊं हूं ! अजिबात माहीत नाहींत. नुसताच तांबड्या भोपळ्यासारखा गरगरीत आहेस झालं !

**भीमः**--काय आहेत धर्मयुद्धाचे नियम ?

**विकल्पः**--पहिला नियम असा, कीं शत्रुपक्ष ज्या शस्त्रानं लढत असेल, तेंच शस्त्र आपणाहि वापरायला हवं. आतां मी वापरीत होतों जिव्हास्त्र. काय ? आलं ना लक्षांत ?

**भीमः**—अरेच्चा ! खरंच कीं !

**विकल्पः**—खरं म्हणजे काय ? अगदींच खरं ! तर तूं तिकडून एखाद्या माजलेल्या रेड्यासारखा जो धुसफुसत आलास, तो सरळ माझ्यावर अर्धचंद्रास्त्राचा प्रयोग केलास ! हें अगदीं चुकलं तुझं. अधर्मयुद्ध झालं.

**भीमः**—पण तूं मला हाडकुळा कां म्हणालास ?

**विकल्पः**—हां ! असं सरळ विचार कीं ! त्याचं असं आहे भीमा, हाडकुळा म्हटल्यानं तूं कांहीं हाडकुळा होत नाहींस. आणि—-युवराजांचं [ दुर्योधनाकडे भीत भीत पहातो ]

**भीमः**—बोल कीं !

**विकल्पः**—बोलतों कीं! मी काय भितों आहे कीं काय कुणाला? युवराजांचं जर समाधान होतं, तर मग अशी निरुपद्रवी थाप मारायला कोणती हरकत आहे ? भीमा, अगदींच हा कीं रे तूं ! तुला हा सामान्य नियम नाहीं शिकवला अजून गुरुवर्यांनीं ?

**भीमः**—नाहीं बुवा !

**विकल्पः**—अरेरे !

[ घाईघाईनें अर्जुन, नकुल, सहदेव, विकर्ण आणि दोघे तिघे कौरव येतात. ]

**विकर्णः**—अरे गप्पा काय मारीत बसलांत ? आत्तां येताहेत आचार्य !

४०५३

**दुर्योधनः**—कुठवर आले रे ते ?

**विकर्णः**—तातांच्या महालांतून ते इकडेच निघाले. वाटेंत विदुरकाकांशीं कांहीं बोलत उभे राहिले आहेत. आत्तां येतील.

**अर्जुनः**—चला, आपापल्या जागांवर बसा सगळे. दुर्योधना ! दुःशासना.

**दुःशासनः**—बरं बरं ! आचार्यांचा आवडता म्हणून त्यांनीं तुला वर्गपाल नेमलाय्, त्याचा एवढा दिमाख नको दाखवूं !

**अर्जुनः**—उगीच नाहीं कोणी आवडता होत. त्याला लागते बुद्धि. त्याला लागते चपलता. त्याला लागतं धनुर्विद्येचं कौशल्य ! देवानं जेव्हां या गोष्टी वांटल्या, तेव्हां आपण मागं विटीदांडू खेळत नाहीं तर जांभया देत बसलां होतांत कुठं तरी !

**दुःशासन**—बरं बरं ! एवढा गर्व नकोस करूं. कुणी तुझ्याहि वरचढ निघेलच कीं !

**अर्जुनः**—उद्यां कोण निघेल तो निघो. आज तर अर्जुनाची बरोबरी करणारा दुसरा कुणी नाहीं. चला, जागांवर बसा.

[ सगळे बसतात. वस्त्रें मळलेला एकलव्य येतो. त्याच्या पाठीवर भाता आणि खांद्यावर कामटीचें धनुष्य आहे. ]

**दुःशासन**—कोण रे तूं ? [ एकलव्य इकडेतिकडे पाहतो. ] अरे ऐकायला येत नाहीं का तुला ? कोण तूं ?

**एकलव्यः**—मी ? मी एकलव्य.

**विकल्पः**—अरे हो ! तें झालं ! पण इथं काय शोधीत आलास ?

**दुर्योधनः**—अरे घोरपड शोधतो आहेस कीं घूस ?

**विकल्पः**—घूस नसली, तर खेकडा शोधीत असेल ! जा बाबा ! इथं नाहीं आलं कांहीं.

**भीमः**—नाहीं कसं ? घूस आणि खेकडा नसला तरी कोल्हा आहे कीं !

**विकल्पः**—कोल्हा ?

**भीमः**—होय. लबाड, धूर्त कोल्हा.

**विकल्पः**—कुठं आहे ?

**भीमः**—तूं कोल्हा नाहीं तर काय आहेस ?

**विकल्पः**—सांभाळ रे बाबा एकलव्या ! काय तुझं नांव तें ? एकलव्यच ना तूं ? हो, एकलव्यच. भीम माझी थट्टा करतोय् बरं का ! नाहीं तर तूं मला खरोखरच कोल्हा समजून ठार मारायचास ! हो ! रानटी माणूस तूं ! तुझं काय घ्या ?

**एकलव्यः**—रानटी असलों, तरी माणूस आहें मी. आणि आमच्या रानांत माणसाला माणूस म्हणतात, कोल्ह्याला कोल्हा !

**दुर्योधनः**—वा: ! पंडित दिसतोय् कीं रे हा !

**विकल्पः**—तर तर ! अरण्यांतला पंडित ! अरण्यपंडित !

**अर्जुनः**—गप्प बसा रे. एकलव्या, काय हवंय् तुला ?

**एकलव्यः**—मला ? मला आचार्य द्रोण हवे आहेत.

**भीमः**—कशाला ?

**एकलव्यः**-तें मी त्यांच्याजवळ सांगेन.

**दुर्योधनः**—असं का ? एवढा माजोरीपणा ? तर मग चालता हो इथून ! आचार्य द्रोण नाहीं भेटायचे तुला.

**एकलव्यः**—कां नाहीं ?

**दुर्योधनः**—आमची इच्छा म्हणून ! ते आमचे शिक्षक आहेत. आम्हांला शिकविण्यासाठीं ठेवलं आहे त्यांना तातांनीं.

**अर्जुनः**—दुर्योधना, तूं चूप बस. आचार्य भेटतील कीं नाहीं, हें त्याला मी सांगेन, तूं नाहीं. वर्गपालाचं काम आहे तें.

**दुर्योधनः**—बरं बरं ! पंडुरोग्याचा पोर अन् पुनः वर शिरजोर !

**भीमः**—दुर्योधना, आतां पुनः जर असं बोललास, तर एका बुक्कींत प्राण घेईन तुझा !

**दुर्योधन**:–अरे जा !

**भीम**:–असं ? [ जाग्यावरून उठतो. दुर्योधन उभा राहतो. सगळे हां हां करतात. ]

**अर्जुन**:–बसतां कीं नाहीं रे खालीं ?

[ द्रोणाचार्य येतात. सगळे आपापल्या आसनावर बसतात. ]

**द्रोण**:–काय चालला होता रे दंगा ?

**अर्जुन**:–कांहीं नाहीं आचार्य.

**द्रोण**–नाहीं कसा ? चालला होता. तुम्हां कौरवांचे आणि पांडवांचे, दोघांचे ग्रह असे कांहीं उलटेसुलटे पडले आहेत ! कधीं म्हणून तुमचं पटायचं नाहीं.तुम्ही अशा भांडणाच्या टिपरघाईत स्वतः अभ्यास काय करणार, आणि दुसऱ्याला काय करूं देणार ! ज्याला नेमकी विद्या शिकायची असेल, त्यानं तुमच्या या गोंधळापासून दूर कुठं तरी जायला हवं. [ एकलव्याकडे पहातात. ] कोण रे तो ? कोण तूं बाळ ?

**दुर्योधन**:–आहे कुणी भिकाऱ्याचा पोर !

**एकलव्य**:–[ डोळे वटारून ] आपणावेगळे सगळेच भिकारी आहेत, अशी कल्पना करणाऱ्या अहंकारी राजपुत्रा, तुझ्यासारखाच मीहि एक राजपुत्र आहें !

**विकल्प**:–राजपुत्र ? ओ हो ! कुठले ? ओसाडगांवचे वाटतं ?

**दुःशासन**:–ओसाडगांवच्या राजपुत्रांचा जयजयकार !

**द्रोण**:–ऐका रे मुलांनो, बाळ, कोण देशाचा तूं ? नांव काय तुझं ?

**एकलव्य**:–माझं नांव एकलव्य. विंध्यपति महाराज हिरण्यधनूंचा मी मुलगा.

**दुर्योधन**:–तुझ्या बापाला विंध्याचा पति कुणीं केलं रे ?

**एकलव्य**:–उद्दाम राजपुत्रा, सिंह हा स्वतःच वनाचा राजा असतो ! त्याला तुमच्यासारखा अभिषेक करावा लागत नाहीं.

सिंहासारखे पराक्रमी माझे वडील वनाचे राजे झाले, ते आपल्या बाहुबळावर !

**भीमः**–ए बाहुबळवाल्या, कुस्ती खेळतोस कां माझ्याशीं ?

**एकलव्यः**–आचार्य द्रोणांशीं गांठ पडून माझं काम झाल्यावर कुस्तीच काय, युद्धहि करीन तुमच्याशीं !

**द्रोणः**–द्रोणांना भेटायचं आहे तुला ?

**एकलव्यः**–होय महाराज !

**द्रोणः**–कशासाठीं बाळ ?

**एकलव्यः**–मी त्यांच्याजवळ शस्त्रास्त्रविद्या शिकण्यासाठीं आलों आहें.

**द्रोणः**–द्रोण तुला शस्त्रास्त्रविद्या शिकवतील, असं तुला कोणीं सांगितलं ?

**एकलव्यः**–कोणीं ? वाटेंत भेटल्या अनेकांनीं ! ते शस्त्रास्त्र-विद्येचे आचार्य आहेत, स्वभावानं फार चांगले आहेत, अशी त्यांची कीर्ति मी सगळ्या वाटेनं ऐकत आलों आहें.

**द्रोणः**-[ विचार करून ] नाहीं बाळ ! द्रोण हा माणूस स्वभावानं अगदीं वाईट आहे ! तो तुला विद्या शिकवायचा नाहीं !

**एकलव्यः**--हां ! सांभाळा ! आचार्य द्रोणांची अशी निंदा मी नाहीं ऐकून घेणार !

**द्रोणः**–कां रे ?

**एकलव्यः**–मीं मनोमनीं त्यांना गुरु मानलं आहे !

**द्रोणः**–मनोमनीं ? पण द्रोण जर नाहीं म्हणाला तर ?

**एकलव्यः**–ते नाहीं म्हणणारच नाहींत.

**द्रोणः**–पण म्हणाला तर काय करशील ?

**एकलव्यः**–काय करीन ? [ विचार करतो. ] काय करीन

बरं ! असं करीन ! ते नाहीं म्हणाले तरी मी त्यांचा शिष्यच राहीन. कारण त्यांना गुरु मानलं आहे ना मीं ?

**द्रोण**:–पण जर त्यानं तुला शस्त्रास्त्रविद्या न शिकवली तर ?

**एकलव्य**:–तर ? तरी मी त्यांच्याजवळच शिकेन.

**द्रोण**:–पण ती कशी ?

**एकलव्य**:–तें तुम्हांला नाहीं सांगणार मी ! ते स्वत: आल्यावर त्यांनाच सांगेन.

**द्रोण**:–बरं. त्यांनीं जर आपल्या विद्येची किंमत तुजजवळ मागितली तर ?

**एकलव्य**:–देईन कीं मी !

**द्रोण**:–कुठून देशील ?

**एकलव्य**:–मीं माझ्याबरोबर वाघाचीं कातडीं, हस्तिदंत आणि चंदनाचं लाकूड आणलं आहे. तें मी गुरुदक्षिणा म्हणून त्यांना अर्पण करीन.

**द्रोण**:–आणि एवढयानं तो संतुष्ट न झाला तर ?

**एकलव्य**:–तर ? तर मग हे माझे प्राण मी त्यांच्या चरणीं वाहीन ! मीं गुरू मानलं आहे ना त्यांना.

**द्रोण**:–धन्य एकलव्या ! तूं धन्य आहेस ! द्रोणाच्या अंगीं तुला आपला शिष्य करून घेण्याएवढी पात्रता नाहीं.

**एकलव्य**:–तें माझं मी पाहून घेईन. पण ते केव्हां आणि कुठं भेटतील तें सांगा.

**द्रोण**:–आत्तां आणि इथं ! बाळ एकलव्या ! मीच आहें तो दुर्दैवी द्रोण !

**एकलव्य**:–काय ? आपण द्रोण ? [ लोटांगण घालतो. ]

**द्रोण**:–ऊठ बाळ. शास्त्रांत असं म्हटलं आहे, कीं ‘ अर्थस्य पुरुषो दासः । ’ मनानं तुझ्यावर जिवापलीकडं प्रेम करूं लागलेला,

पण ज्याचं शरीर विकलं गेलं आहे, असा मीच तो द्रोण. एकलव्या! मीं तुला शिकवूं शकणार नाहीं. कारण राजपुत्र आणि त्यांचे मित्र यांच्याशिवाय दुसऱ्या कोणालाहि शिकवणार नाहीं, असं बंधन घालून घेतलं आहे मीं माझ्याभोंवतीं.

**एकलव्य**:—मग मी आतां काय करूं? कुठं जाऊं? कसा शिकूं?

**द्रोण**—बाळ, तूं पुनः वनांत जा. तिथं ईश्वरानं लिहिलेला भला मोठा ग्रंथ पसरला आहे, त्याचं पठण कर. त्यावरून अभ्यास कर. तुला आशीर्वाद देतों मी. [एकलव्य द्रोणांना नमस्कार करतो.]

**द्रोण**:—जा बाळ. तळमळ हाच खरा गुरु आहे! तो तुझ्या-बरोबर वागवीत आहेस तूं! चुकशील, तिथं तो तुला सांगेल. थांबशील तिथं धीर देईल; अडखळशील, तिथं वाट दाखवील.

[ यवनिका पतन ]

---

# तृतीय अंक

[ हस्तिनापुराभोंवतालचें अरण्य. एका बाजूस मातीचा एक ओबडधोबड बसलेला पुतळा आहे. पडदा उघडल्यावर रंगभूमीवर कोणीहि नसतें. पाठीवर गांठोडीं बांधलेले विराध आणि दीर्घयष्टि प्रवेश करतात. ]

**दीर्घयष्टिः**–विराधा, थांब बाबा इथं थोडासा, पार कामांतून गेलों मी. अशी जर माझी परवड काढलीस, तर विंध्य पर्वतांतील आपली झोपडी सोडून राजपुत्र एकलव्याचा शोध करण्यासाठीं घरच्या माणसांना न विचारतां पळून आलेल्या आपणां दोघांपैकीं हा दीर्घयष्टि इथंच कुठं तरी संपायचा, अन् मग तुला एकट्यालाच आमच्यासाठीं खड्डा खणारे अन् माती लोटारे—— !

**विराधः**–दीर्घयष्टि, तुझी शरीरयष्टि नुसती दिसायलाच तेवढी दीर्घ कां रे ? अरे पहाटे आपण मुक्काम सोडून पुढें निघालों, अन् नुकता कुठें सूर्य हातभर वर येतोय्.

**दीर्घयष्टिः**–विराधा, आपला आक्षेप आहे !

**विराधः**–कोणाविषयीं ? माझ्याविषयीं ?

**दीर्घयष्टिः**--नाहीं. सूर्याच्या या गतीविषयीं.

**विराध**:--तुझा आक्षेप नाहीं कोणाविषयीं ? एकलव्य आज तीन वर्षं विंध्य सोडून इकडं आला, त्याविषयीं तुझा आक्षेप. त्याची आई त्याची चिंता करून बिचारी झुरत्ये आहे, तिच्याविषयीं तुझा आक्षेप. महाराज हिरण्यधनु तिकडे लक्ष देत नाहींत, त्याबद्दल तुझा आक्षेप. आपण दोघांनीं त्याला शोधायला निघायचं ठरवलं, त्याबद्दल तुझा आक्षेप. हस्तिनापुरांत त्याचा तपास कुठं लागेना, म्हणून तुझा आक्षेप. सूर्याच्या गतीबद्दल आक्षेप घेणारा तूं, तुझ्या या आक्षेप घेणाऱ्या स्वभावाबद्दल आक्षेप घेत नाहींस, हेंच आमचं भाग्य !

**दीर्घयष्टि**:–विराधा, तुला एवढं लांब भाषण करायचं आहे, हें मला अगोदर सांगितलं असतं तर ?

**विराध**:–काय केलं असतंस ?

**दीर्घयष्टि**:–अरे तेवढीच झोंप काढली असती.

**विराध**:–पुरे रे थट्टा ! आतां झपाट्यानं एकलव्याचा तपास करून त्याला एकदांचा घरीं नेऊन गुदरायला हवा. नाहींतर त्याची आई—तिची अन् त्याची कांहीं भेट व्हायची नाहीं.

**दीर्घयष्टि**:–आतां आणखी कुठं कुठं शोधावं लागणार आहे या बापड्याला !

**विराध**:–थांब. इथं ही एक मूर्ति दिसत्ये आहे. ओबडधोबडच आहे ! पण कोणीतरी रोज हिची पूजा करीत असला पाहिजे. तीं फुलं पडलीं आहेत बघ. तो आजही इथं येईल, तोंवर तुझ्या म्हणण्याप्रमाणं इथंच थांबूं.

**दीर्घयष्टि**:–ही मूर्ति काय ? छान ! डोक्याच्या जागीं ठेवलेलं हें मडकं ! [ मूर्तीला हाताळतो. ] या तागाच्या मिशा अन् दाढी ! वा: ! मक्याच्या शेतांत ठेवायला बुजगावणं छान आहे !

[ नेपथ्यांतून ध्वनि येतो. " ए शठांनो ! गुरुमहाराजांच्या मूर्तीला हात लावतां ? थांबा ! तुम्हांला शिक्षा लावतों. " ]

**विराध**:–[ चपापून ] अरे ! एकलव्य कीं काय ?

**दीर्घयष्टि**:–होय ! तोच कीं !

[ एकलव्य हातीं कमंडलु, फुलें, खांद्यावर धनुष्य, बाणांचा भाता, अशा वेषांत संतापलेला प्रवेश करतो. यांना पहातांच थबकतो. ]

**विराध**:–एकलव्या !

**एकलव्य**:–विराधा ! [ एकमेकांना मिठी मारतात. ]

**दीर्घयष्टि**:–अन् मी दीर्घयष्टि ! भेटलास बाबा एकदांचा ! या बुजगावण्यानं तुझी आमची भेट—

**एकलव्य**:–हां ! दीर्घयष्टि, तें बुजगावणं नाहीं. आचार्य द्रोणांची मूर्ति आहे ती.

**विराध**:–ती कशासाठीं ?

**एकलव्य**:–मला शिकविण्यासाठीं. मी शिकत असतों ह्या मूर्तीजवळ.

**दीर्घयष्टि**:–या मूर्तीजवळ ?

**एकलव्य**:–होय. [ मूर्तीजवळ जाऊन तिच्या पायांवर कमंडलूंतील पाणी ओततो. ]

**दीर्घयष्टि**:–एकलव्या, तूं इकडं कठीण मन करून शिकतो आहेस, अन् तिकडं तुझी आई तुझ्यासाठीं झुरून झुरून तिनं अंथरूण धरलं आहे कीं रे !

**एकलव्य**:–[ थबकून ] आईनं ?

**विराध**:–होय. आईनं ! महाराज तिकडं दुर्लक्ष करताहेत. ते म्हणतात, एकलव्याची विद्या पुरी झाल्याशिवाय तो कांहीं

घायचा नाहीं. शेवटीं आम्ही त्यांना न कळवतांच तुझ्या तपासा-साठीं निघालों.

**दीर्घयष्टि**:–पुरे झालं तुझं अध्ययन. एवढं अध्ययन करून शेवटीं रानांत शिकार करायची ना? ती आम्ही अध्ययन न करतांहि करतों. तूं एका बाणांत पळत्या डुकराचा जीव घेशील. आम्ही त्याला दगडांनीं ठेंचून मारूं. दोन्हींचा अर्थ एकच.

**विराध**:–आतां घरीं चलून एकदां आईला भेट बाबा !

[ एकलव्य तसाच उभा आहे. त्याच्या मुद्रेवर अस्थिरता दिसते. शेवटीं तो एकदम मूर्तीकडे वळतो, आणि हातीं फुलं घेत म्हणतो.]

**एकलव्य**:–विराधा,तुम्ही घरीं जा! आईला अनंतकोटि नमस्कार सांगा. तिला म्हणावं, रोज एकलव्य तुझी आठवण करतो. एकहि दिवस त्यावांचून सुना जात नाहीं. पण तो आपल्या प्रतिज्ञे-प्रमाणं विद्या पुरी करून मगच तिकडं येईल. विद्या संपतांच अगदीं धांवतच तिकडे निघेल तो. वाटेंत पाणी सुद्धां कुठें पिणार नाहीं. आणि–आणि–आणि एवढंहि करून तुझी भेट न झाली, तर–तर तिला म्हणावं, एकलव्य तुझी कूस धन्य करण्यासाठींच प्रयत्न करीत होता !

**दीर्घयष्टि**:–एकलव्या, ही मूर्ति कशी काय शिकवत्ये तुला, तें तरी कळूं दे आम्हांला निघण्यापूर्वीं.

**एकलव्य**:–आचार्यांनीं मला आशीर्वाद दिला, कीं तुला विद्या येईल. त्यांच्या या मूर्तीची रोज आज्ञा घेऊन मग मी अध्ययनाला प्रारंभ करतों.

**दीर्घयष्टि**:–ती तुला अनुज्ञा देते ?

**एकलव्य**:–होय. [ मूर्तीच्या डोक्यावर फुलें ठेवीत विचारतो. ] आचार्य, करूं प्रारंभ ? [ फुलें खालीं पडतात. ] हीं खालीं पडलेलीं

फुलं म्हणजे आचार्यांची आज्ञा. आतां अध्ययनाला प्रारंभ–[ खांद्यावरील भात्यांतून बाण काढून तो धनुष्यास जोडतो, तोंच नेपथ्यांतून कुत्र्याच्या भुंकण्याचा ध्वनि ऐकूं येतो. ] आं ! आज तुम्हांबरोबर दुसरंहि कोणी तरी या निर्जन वनांत आलेलं दिसतंय् !

**विराध**:–नाहीं बुवा, आम्हांला कोणी दिसलं नाहीं. [ कुत्र्याचें भुंकणें जवळ ऐकूं येतें. ]

**दीर्घयष्टि**:--सांभाळ रे बाबा एकलव्या ! तुझा हा कुत्रा चावाय्-बिवाय्चा मला !

**एकलव्य**:–हा कुत्रा माझा नव्हे. पण तो तुला चावणार नाहीं, अशी व्यवस्था मात्र करतों मी. [ एकामागून एक सात बाण कुत्र्याच्या दिशेनें सोडतो. कुत्रा विवळूं लागतो, आणि शेवटीं विवळणेंहि बंद होतें. ]

**दीर्घयष्टि**:–शाब्बास एकलव्या ! आहे बुवा ! आतां झालासच कीं रे तूं धनुर्धर !

[ आंतून ध्वनि येतो. "आँ ! हा कोण अप्रतिम धनुर्धर ? आमच्या कुत्र्याचं तोंड त्याला एवढाहि धक्का न लागूं देतां कोणीं बंद केलं ?" पाठोपाठ अर्जुन, भीम, दुःशासन आणि विकर्ण येतात. ]

**एकलव्य**:–मीं बंद केलं.

**भीम**:–कोण तूं ?

**एकलव्य**:–मी ! मी अरण्यपंडित, ओसाडगांवचा राजपुत्र, भिकाऱ्याचा पोर—

**अर्जुन**:–तूं एकलव्य ?

**एकलव्य**:–होय. आचार्य द्रोणांचा लाडका शिष्य एकलव्य.

**अर्जुन**:–आचार्य द्रोणांचा शिष्य ?

**एकलव्य**:–होय ! त्यांचा पट्टशिष्य ! रोज ते मला हातीं

धरून शिकवितात, चुकलों तर सांगतात, थकलों तर पाठीवरून हात फिरवितात—

**अर्जुन**:–कोण? स्वतः आचार्य द्रोण?

**एकलव्य**:–होय! स्वतः आचार्य द्रोण! [ द्रोण येऊन एका बाजूला उभे राहतात. ]

**दुःशासन**:–साफ खोटं आहे हें!

**एकलव्य**:–राजपुत्रा! रानटी माणसं खोटं बोलत नसतात. त्यांना खोटं बोलायची आवश्यकताच भासत नाहीं.

**अर्जुन**:–तूं झोपेंत बोलतो आहेस एकलव्या! तुझं अस्त्रकौशल्य अप्रतिम आहे, पण तें तुला आचार्य द्रोणांनीं पढविलेलें नाहीं. आचार्य द्रोण तर रात्रंदिवस आम्हां कौरवपांडवांबरोबर असतात. ते आम्हांला सकाळीं उठवतात. नंतर आम्हांला संथा देतात, आम्हांकडून शस्त्राभ्यास करवून घेतात, रात्रीं ते आमच्याजवळ झोंपतात—

**एकलव्य**:–राजपुत्रा! मी अगदीं शुद्धीवर बोललों आहे! मात्र माझं अध्ययन वेगळ्या पद्धतीनं होतं. आचार्य द्रोण तुम्हांला उठवितात, पण मी त्यांच्या अगोदर उठतों. ते तुम्हांला संथा देतात, मी त्यांच्या पायांजवळ बसून संथा घेतों. ते तुम्हांकडून शस्त्राभ्यास करवितात, मी त्यांना विचारून शस्त्राभ्यास करतों. ते तुम्हांजवळ झोंपतात, आणि मी त्यांच्या पायांजवळ झोंपतों! मघां जो अस्त्रविद्येचा चमत्कार तूं पाहिलास, ती सगळी त्यांची कृपा.

**दुःशासन**–आचार्य द्रोणांनीं फसवलं आम्हांला! द्रव्य घेतलं आमच्याकडून, अन् आम्हांला ठोंब्ये ठेवून विद्या दिली या रानटी जनावराला!

**अर्जुन**:–आचार्य! आचार्य! तुम्हीं सुद्धां हेंच करावं ना? तुम्हीं एकदां माझा हा घट्टे पडलेला अंगठा पाहून असं म्हणाला

अनुक्र. 25003

होतात, कीं अर्जुना, तुझा हा अंगठा विश्वविजयी होईल ! तें वचन तुम्हीं खोटं केलंत ना ? [ द्रोण पुढें येतात. ]

**द्रोण**:–नाहीं अर्जुना ! मीं तें वचन खोटं केलं नाहीं.

**एकलव्य, अर्जुन**:–कोण ? आचार्य द्रोण ?

[ एकलव्य धांवत जाऊन द्रोणांच्या पायांवर डोकें ठेवतो. अर्जुन रुसून एका कोपऱ्यांत जाऊन उभा राहतो. ]

**द्रोण**:–धन्य एकलव्या! तूं धन्य आहेस ! [ अर्जुनाजवळ जाऊन ] अर्जुना, रुसलास तूं ? तुला रुसायचं कांहीं कारण नाहीं. दुःशासनाचं म्हणणं खरं आहे. मी तुमच्या अन्नावर जगलों. तुझा बाण ओढून घट्टे पडलेला अंगठा विश्वविजयीच होईल !

**अर्जुन**:–पण एकलव्य—

**द्रोण**:–तो माझा शिष्य म्हणवतो. एकदां तो माझ्या पायीं आपला जीवहि द्यायला तयार झाला होता. एकलव्या, मी मागेन तें देशील ?

**एकलव्य**:–आचार्य, आपण मुखांतून शब्दच काढा, कीं—

**द्रोण**:–ठीक आहे. एकलव्या ! आजपासून तूं बाण मारतांना अंगठ्याचा उपयोग करूं नयेस ! या तुझ्या अगतिक झालेल्या गुरूला ही भिक्षा घाल !

**एकलव्य**:–आज्ञा प्रमाण आचार्य !

**अर्जुन**:–पण आचार्य, तुम्हीं याला विद्या कशी शिकविलीत ?

**द्रोण**:–अर्जुना, विद्या कोणीहि देत नसतो. गुरु हा केवळ सहाय्यक आहे. स्वतःच आपल्या प्रयत्नबलानं विद्येला जिंकून आणावं लागतं, आणि मग ती आपल्या गळयांत विजयमाला घालते. एकलव्यानं तें केलंन्. रात्र आणि दिवस, ऊन्ह आणि पाऊस, भूक आणि तहान, कशाकशाची चिंता न करतां तो

यत्न करीत राहिला, विद्या त्याच्या घरीं आपल्या पायांनीं चालत आली. आणि मीं याला कसं शिकवलं म्हणतोस ? एकलव्या, सांग बावा.

**एकलव्य**:–[ मूर्तीजवळ जाऊन ] ही माझी गुरुमूर्ति ! हे आचार्य द्रोण ! मी चुकलों, कीं हे गुप्तरूपानं माझ्या कानांत येऊन सांगत ! मीं बरोबर असलों, कीं हे गुप्तरूपानं माझी पाठ थोपटीत. यांच्यावर निष्ठा ठेवून मीं अभ्यास केला, माझ्या व्रताची साधना पूर्ण झाली !

**अर्जुन**:–धन्य एकलव्या ! [ त्याला जाऊन मिठी मारतो. ]

**द्रोण**:–धन्य एकलव्या ! अवघ्या विद्यार्थी जगासमोर तूं एक आदर्श निर्माण करून ठेवला आहेस ! आज तूं गुरुदक्षिणा दिलीस, तुझं अध्ययन पूर्ण झालं ! युगं येतील आणि जातील, पण विद्यार्थीविश्व म्हणेल, कीं अध्ययन करावं, तर तें एकलव्यासारखं ! विद्यार्थ्यांच्या सृष्टींत एकलव्य हें नांव अजरामर राहील.

[ एकलव्य नमस्कार करतो. ]

यवनिका पतन

म. ग्रं. सं. ठाणे ग्रन्थालय ठाणे
नं.. ४००५३ नों दि
ग्रं. वा.
अनुक्रम ४००५३
विभाग वा
क्रमांक ९९०५
नों. दि. ३१/३/६७
IRBK-0104053